**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६ ०४९२) लेखाशीर्षांतर्गत अनुदान वितरण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.९३/फ-११**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ मार्च, २०१९

वाचा :-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक साववि२०१८/ प्र.क्र. ७४/ फ-११,दि. १९ मे, २०१८
२) महसूल व वन विभाग ,शासन निर्णय क्रमांक साववि२०१८/ प्र.क्र. ७४/ फ-११,दि. २९ मे, २०१८
३) महसूल व वन विभाग ,शासन निर्णय क्रमांक साववि२०१८/ प्र.क्र. ७४/ फ-११,दि. २१ जून, २०१८
४) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१२६६/२०१८-१९, दि. १६.१०.२०१८
५) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१२९८/२०१८-१९, दि. २२.१०.२०१८
६) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१३२७/२०१८-१९, दि. ३०.१०.२०१८
७) महसूल व वन विभाग ,शासन निर्णय क्रमांक साववि२०१८/ प्र.क्र. ७४/ फ-११,दि. २३ ऑक्टोबर २०१८,
८) महसूल व वन विभाग ,शासन निर्णय क्रमांक पूरक-२०१८/प्र.क्र.९३ /फ-११ दि. ३० ऑक्टोबर २०१८
९) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१३६७/२०१८-१९, दि. ०२.११.२०१९
१०) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक पूरक-२०१८/प्र.क्र.९३ /फ-११ दि. ३ नोव्हेंबर २०१८
११) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१५००/२०१८-१९, दि. २६.११.२०१८
१२) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१८१९/२०१८-१९, दि. ११.०१.२०१९
१३) अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर, यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/ यो/नबाप्र/ प्र.क्र.६९/०४९२/१९२१/२०१८-१९, दि. २४.०१.२०१९
१४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क.६९/अर्थ-३, दि.२५.०१.२०१९
१५) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक पूरक-२०१८/प्र.क्र.९३ /फ-११ दि. ४ फेब्रुवारी २०१९
१६) वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र. ४२/ अर्थ-३, दिनांक ८.मार्च २०१९
१७) महसूल व वन विभाग ,शासन ज्ञापन क्रमांक बीयुडी-२०१९/ ४४०६/ प्र.क्र. २६/ब-१, दि. ८मार्च २०१९
१८) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक पुरक -२०१८/ प्र.क्र.९३/ फ-११,दि. १६ मार्च २०१९
१९) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक पुरक -२०१८/ प्र.क्र.१६७/ फ-११,दि. २६ मार्च २०१९
२०) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक पुरक -२०१८/ प्र.क्र.९३/ फ-११,दि. २७ मार्च २०१९

**प्रस्तावना :-**

वने व वनेतर क्षेत्रात वृक्ष लागवड व संवर्धन करण्याकरीता राज्य योजनेंतर्गत सन २०१८-१९ करीता "सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण (४४०६ ०४९२)" या योजनेंतर्गत प्राप्त अनुदानाबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अक्र. | सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण (४४०६०४९२) | मूळ तरतूद रक्कम (रुपये लाखात) | पुरवणी मागणी जुलै/नोव्हे.१८ (रुपये लाखात) | एकूण तरतूद (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | **वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम** | ३०१३५.०० | **२७४६०.००** | ५७५९५.०० |
| २ | महत्वाच्या रस्त्यांच्या दुतर्फा असणाऱ्या टेकडयांचे हरितीकरण | ६१०.०० | --- | ६१०.०० |
| ३ | महत्वाचे रस्ते/रेल्वे/ कालवे यांचे दुतर्फा वृक्षलागवड | ३६२५५.०० | १२५००.०० | ४८७५५.०० |
| | **एकूण** | ६७०००.०० | ३९९६०.०० | १०६९६०.०० |

२. मागणी क्रमांक सी -१०-४४०६, वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च या लेखा शिर्षांतर्गत (००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम (४४०६ ०४९२) अंतर्गत (वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रमासाठी अर्थसंकल्पित असलेला सुधारित अंदाजाच्या मर्यादेत रु.५७५९५.०० लक्ष निधी खाली नमूद शासन निर्णयांन्वये पुर्णपणे वितरित करण्यात आलेला असून महत्वाचे रस्ते/रेल्वे/ कालवे दुतर्फा या योजनेमध्ये शिल्लक असलेला रु. २४०.८३ लक्ष चा निधी शासन निर्णय दि. २७.०४.२०१९ अन्वये “वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रमासाठी” वळती करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | शासन निर्णय | रक्कम (रुपये लाखात) |
|---|---|---|
| १ | १९.०५.२०१८ | ४३९७.०० |
| २ | २९.०५.२०१८ | ३२८५.७२ |
| ३ | २१.०६.२०१८ | ५२६३.८९ |
| ४ | २३.१०.२०१८ | ६३९०.२६ |
| ५ | ३०.१०.२०१८ | १२६६.९९ |
| ६ | ३.११.२०१८ | ४९०.१४ |
| ७. | ०४.०२.२०१९ | ९०४०.५० |
| ८. | १५.०३.२०१९ | २७४६०.०० |
| ९ | **२७.०३.२०१९**<br>**( रस्ता दुतर्फा वृक्षलागवड मधून वळती)** | **२४०.८३** |
| | **एकूण** | **५७८३५.८३** |

३. वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६ ०४९२) या योजनेंतर्गत कोल्हापूर वनवृत्ताच्या प्रस्तावातील १२४९ हेक्टर क्षेत्रावरील पूर्वपावसाळी कामाकरिता संदर्भ क्र. १५ येथील शासन निर्णय दि.०४.०२.२०१९ अन्वये रु. १३१.०८ लक्ष निधीचे वितरण करण्यात आलेले आहे. परंतू सदर कामे दुस-या योजनेमधून करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर प्रस्ताव रद्द समजून त्याऐवजी मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांनी १२३ हेक्टर क्षेत्रावर करावयाच्या पूर्वपावसाळी कामाचा तेवढयाच रकमेचा सुधारित प्रस्ताव सादर केलेला असून त्यास शासन मान्यता देण्याची विनंती केली आहे.

४. सदर योजनेंतर्गत दि.२४.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेल्या रु.३०२१०.२५ लक्ष निधीपैकी कोल्हापूर वनवृत्त वगळून इतर १२ वनवृत्तांसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे रु. १०७३.३२८ लक्षच्या प्रस्तावासाठी अद्याप निधी वितरणाची आवश्यकता आहे.

**( रु. लाखात )**

| अ.क्र. | वनवृत्त | मागणी केलेली एकूण रक्कम | शासन निर्णय दि ०४.२.२०१९. अन्वये वितरित रक्कम | शासन निर्णय दि . ५.०३.२०१९अन्वये वितरित रक्कम | शासन निर्णय दि .२७.०५.२०१९ अन्वये वितरित रक्कम | वितरित करावयाची उर्वरित रक्कम | आता वितरित केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ३१३४.८६ | ९३८ | २०६०.४३४ | २५ | १११.४२६ | १३.६ |
| २ | औरंगाबाद | ९४६५.७५ | २८३२ | ६२२१.१३९ | ७५.५९ | ३३७.०२१ | ४१.१२ |
| ३ | धुळे | १६४३.०७ | ४९२ | १०७९.५८८ | १३.०९ | ५८.३९२ | ७.१२ |
| ४ | नाशिक | ४४९.३ | १३४ | २९५.७१४ | ३.५९ | १५.९९६ | १.९५ |
| ५ | पुणे | ३०५२.३८ | ९१३ | २००६.५२४ | २४.३३ | १०८.५२६ | १३.२ |
| ६ | यवतमाळ | ७५५.४८ | २२६ | ४९६.५९९ | ६.०२ | २६.८६१ | ३.२७ |
| ७ | कोल्हापूर | ८४१.५८ | २५२ | ५५२.९६७ | ६.७१ | २९.९०३ | -- |
| ८ | ठाणे | १४६५.१ | ४३८ | ९६३.३१७ | ११.६९ | ५२.०९३ | ६.३५ |
| ९ | गडचिरोली | २८३६.७१ | ८४९ | १८६४.२७३ | २२.६१ | १००.८२७ | १२.३ |
| १० | चंद्रपूर | २७०६.९८ | ८१० | १७७९.१७७ | २१.५८ | ९६.२२३ | ११.७४ |
| ११ | नागपूर | ३५२५.१८ | १०५५ | २३१६.७८१ | २८.१ | १२५.२९९ | १५.२९ |
| १२ | मेळघाट व्याघ्र प्रकल्प(MTR) | २९७.१४ | ८९ | १९५.२१४ | २.३७ | १०.५५६ | ४.९४ |
| १३ | ताडोबा अंधारी (TATR ) व्याघ्र प्रकल्प | ३६.७२ | १२.५ | २३.८६५ | ०.१५ | ०.२०५ | ०.२ |
| | एकूण | **३०२१०.२५** | **९०४०.५** | **१९८५५.५९** | **२४०.८३** | **१०७३.३२८** | **१३१.०८** |

५. परि.क्र. ३ मध्ये नमूद केलेला रु. १३१.०८ लक्ष निधी पुन्हा कोल्हापूर वनवृत्तास इतर कामासाठी उपलब्ध करुन देण्याऐवजी परि. क्र. ४ मधील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कोल्हापूर वनवृत्त वगळून इतर १२ वनवृत्तांसाठी वळती करुन वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात **(००) (०६) सामूहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम ( ४४०६ ०४९२ )** या योजनेंतर्गत वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६ ०४९२) या योजनेंतर्गत शासन निर्णय दि.०४.०२.२०१९ अन्वये कोल्हापूर वनवृत्तातील पूर्वपावसाळी कामाकरिता वितरित केलेला रु. १३१.०८ लक्ष निधी सोबतच्या

प्रपत्रात नमूद केल्याप्रमाणे कोल्हापूर वनवृत्त वगळून इतर १२ वनवृत्तांसाठी वळती करुन वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखड्याप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना द्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

३. वितरित करुन घेतलेला निधी मंडळे/ महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधीमध्ये काढून ठेवता येणार नाही. सदर निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतुदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

४. जिल्हानिहाय वितरीत तरतूदीची माहिती व राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची/झालेल्या खर्चाचा तपशील शासनास दरमहा विहित प्रपत्रात सादर करण्यात यावा. तसेच योजनेचे संनियंत्रण प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्यामार्फत व्हावे.

५. प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यापूर्वी संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी यांनी वनीकरणासाठी निवडलेले क्षेत्र योग्य असल्याबाबत खातरजमा करावी. प्रस्तुत प्रकरणी कार्यादेश देण्यापूर्वी तपशिलवार उपचार नकाशा तयार केला असल्याबाबत खातरजमा करावी.

६. सदर योजने अंतर्गत होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर अर्थसंकल्पीत निधीतून वित्त विभागाच्या संदर्भिय दिनांक ०२.०४.२०१८ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून खर्ची टाकण्यात यावा.

**“मागणी क्र.सी-१०,**
**४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च,**
**(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण,**
**वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६०४९२).**

७. सदर शासन निर्णय संदर्भ क्रमांक १४ व १६ येथील वित्त विभागाच्या संदर्भिय अनुक्रमे दि. २५.०१.२०१९ व दि.०८.०३.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८ सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२९१५००१०३७१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DAMODHAR SITARAM DALVI

Digitally signed by DAMODHAR SITARAM DALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=ef72079fa46879c38e604681191069c57000e73e78700748258ef7a9095f84d9, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=f62a7252ed770981b2324209adc4d21c5f260d6817740e3a114e91e153b61422, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=DAMODHAR SITARAM DALVI
Date: 2019.03.29 15:07:38 +05'30'

**( दामोधर दळवी )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**सोबत**:- प्रपत्र

**प्रत,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण , महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) (११ वृत्त)
५. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ( मेळघाट व्याघ्र प्रकल्प -MTR)/ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प -TATR)
६. वनसरंक्षक , सामाजिक वनीकरण ( ६ वृत्त)
७. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
८. महालेखापाल, (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई ४०० ०३२.
११. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
१२. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
१३. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५. उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१६. निवडनस्ती/फ-११.

**<u>शासन निर्णय क्रमांकः पूरक-२०१८/प्र.क्र.९३/फ-११, दि. २९.०३.२०१९ सोबतचे प्रपत्र</u>**

मागणी क्रमांक सी -१०-४४०६,
वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च
(००)(०६) सामुहिक पातळीवर ठोस वनरोपण कार्यक्रम ( ४४०६ ०४९२ )
वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम

**( रु. लाखात )**

| अ.क्र. | वनवृत्त | मागणी केलेली एकूण रक्कम | शासन निर्णय दि ०४.२.२०१९. अन्वये वितरित रक्कम | शासन निर्णय दि . ५.०३.२०१९अन्वये वितरित रक्कम | शासन निर्णय दि .२७.०५.२०१९ अन्वये वितरित रक्कम | वितरित करावयाची उर्वरित रक्कम | आता वितरित केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | ३१३४.८६ | ९३८ | २०६०.४३४ | २५ | १११.४२६ | १३.६ |
| २ | औरंगाबाद | ९४६५.७५ | २८३२ | ६२२१.१३९ | ७५.५९ | ३३७.०२१ | ४१.१२ |
| ३ | धुळे | १६४३.०७ | ४९२ | १०७९.५८८ | १३.०९ | ५८.३९२ | ७.१२ |
| ४ | नाशिक | ४४९.३ | १३४ | २९५.७१४ | ३.५९ | १५.९९६ | १.९५ |
| ५ | पुणे | ३०५२.३८ | ९१३ | २००६.५२४ | २४.३३ | १०८.५२६ | १३.२ |
| ६ | यवतमाळ | ७५५.४८ | २२६ | ४९६.५९९ | ६.०२ | २६.८६१ | ३.२७ |
| ७ | कोल्हापूर | ८४१.५८ | २५२ | ५५२.९६७ | ६.७१ | २९.९०३ | -- |
| ८ | ठाणे | १४६५.१ | ४३८ | ९६३.३१७ | ११.६९ | ५२.०९३ | ६.३५ |
| ९ | गडचिरोली | २८३६.७१ | ८४९ | १८६४.२७३ | २२.६१ | १००.८२७ | १२.३ |
| १० | चंद्रपूर | २७०६.९८ | ८१० | १७७९.१७७ | २१.५८ | ९६.२२३ | ११.७४ |
| ११ | नागपूर | ३५२५.१८ | १०५५ | २३१६.७८१ | २८.१ | १२५.२९९ | १५.२९ |
| १२ | मेळघाट व्याघ्र प्रकल्प(MTR) | २९७.१४ | ८९ | १९५.२१४ | २.३७ | १०.५५६ | ४.९४ |
| १३ | ताडोबा अंधारी (TATR ) व्याघ्र प्रकल्प | ३६.७२ | १२.५ | २३.८६५ | ०.१५ | ०.२०५ | ०.२ |
| | एकूण | **३०२१०.२५** | **९०४०.५** | **१९८५५.५९** | **२४०.८३** | **१०७३.३२८** | **१३१.०८** |

*****